# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**सायंकाळ**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ३०.०९.२०२५ मंगळवार**

**सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा निरोप समारंभ संपन्न :—**

आज दिनांक ३०.०९.२०२५ चे १५.३० वा. नागपुर पोलीस आयुक्तालयातर्फे ऑडीटोरीयम हॉल, पोलीस भवन येथे सप्टेंबर — २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचे निरोप समारंभ कार्यक्रम मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अध्यक्षतेखाली तसेच, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नित्यांद झा पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. शशिकांत सातव, पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा), मा. श्रीमती डॉ. अश्वीनी पाटील पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) व श्रीमती. शालीनी शर्मा सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजीत करण्यात आलेला होता. सेवानिवृत्त होणारे एकुण **१७** अधिकारी आणि अंमलदार यांना सपत्नीक भावपुर्ण निरोप देण्यात आला.

याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना सेवाकाळात केलेले कामगिरी बद्दल प्रसंशा करून, त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या. तसेच, त्यांनी शारिरीक व मानसिक दृष्ट्या सदृढ राहावे. गाणी, पेटींग ईत्यादी छंद जोपासावे व सेवानिवृत्तीचा मिळणारा आर्थिक लाभांश काळजीपुर्वक गुंतवणुक करण्याचा मोलाचा सल्ला दिला. त्याचप्रमाणे त्यांना निवृत्ती वेतन व ईतर सेवानिवृत्तीचे लाभ लवकरात लवकर मिळवुन देण्याचे आश्वासन दिले. मा. सह पोलीस आयुक्त यांनी सुध्दा सर्व सेवानिवृत्त होणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्या. तसेच, याप्रसंगी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पाल्यांनी आपले पालकाबाबत असलेली भावना व मते व्यक्त केली. मा. पोलीस आयुक्त यांनी स्वत: निरोप समारंभ कार्यक्रमाकरीता उपस्थित राहुन घेतलेली दखल व त्यांच्या हस्ते मिळालेले स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र हा एक आठवणीचा क्षण त्यांच्या स्मरणात राहील, अशा प्रकारची भावना सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे कुटुंबीयांनी व्यक्त केली.

कार्यक्रम प्रसंगी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ क्र. २) नागपुर शहर व त्यांच्या पत्नी श्रीमती आयुषी सिंग (भाप्रसे) यांचे संयुक्तीक लिखीत ''इंडीयन सोसायटी'' नामक पुस्तकाच्या आवृत्तीचे अनावरण मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे हस्ते करण्यात आले. नमुद पुस्तक हे केंद्रीय लोकसेवा आयोग तथा राज्य लोकसेवा आयोगाचे मार्फतीने आयोजीत परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शनाकरीता आहे.

कार्यक्रमाकरीता मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी व अंमलदार हे आपले परीवारासह हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोनि. श्री. अमोल दौंड व आभार प्रदर्शन पोउपआ. श्री. राहुल माकणीकर यांनी केले.

(कामगिरी)

**१) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०९.२०२५ चे ०७.३० वा. चे सुमारास, फिर्यादी फैजुल्ला खान हफीजुल्ला खान, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट. ४१५, यादव नगर, यशोधरानगर, नागपुर हे त्यांची सुझूकी बर्गमॅन गाडी क्र. एम.एच. ४९ सि.बी. १४७६ ने पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन कमाल चौक येथुन जात असता, कमाल चौक जवळील देशी दारू भट्टी समोर, गाडी पार्क करून लघुशंका करण्यासाठी बाजुचे गल्लीत जात असता, एक अनोळखी ईसमाने फिर्यादी जवळ येवून, चाकूचा धाक दाखवुन, त्यांचे जवळुन गाडीची चाबी हिसकावून, नमुद गाडी किंमती अंदाजे ५०,०००/—रू. ची जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस ठाणे पाचपावलीचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना पाहुन एक ईसम त्याचे जवळील सुझूकी बर्गमॅन गाडी सोडून पळून जाताना दिसुन आला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्यांने त्याचे नाव किर्तीराज हेजमेजर जयराम, वय १९ वर्ष रा. आनंद नगर, एन.आय.टी क्वॉर्टर नं. १४२, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्यास गाडी बाबत विचारपूस केली असता, त्यांने नमुद गाडी हि शस्त्राचा धाक दाखवुन जबरीने चोरी केल्याचे सांगीतले. आरोपीची झडती घेतली असता, त्याचे कमरेत एक लोखंडी चाकू मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन सुझूकी बर्गमॅन गाडी क्र. एम.एच. ४९ सि.बी. १४७६ व लोखंडी चाकू असा एकुण किंमती ५०,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेन्द्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्रीमती. श्वेता खाडे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. बाबुराव राऊत, पोउपनि. रंजीत माजगावकर, पोहवा. रविन्द्र राऊत, मुकेश यादव, सुशील रेवतकर, पोअं. राजकुमार पाल, युनूस खान, पदमाकर उईके व अमीत ठाकूर यांनी केली.



**२) सदर पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द कारवाई.**

दिनांक २९.०९.२०२५ चे २०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर येथील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, माऊंट रोड, सदर, नागपूर येथील डाऊन टाऊन हुक्का पार्लर (ठिकाणा) मध्ये रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी मॅनेजर नामे गौरव श्रीराम बोकडे, वय ३२ वर्ष, रा. दुर्गा नगर, मानेवाडा रोड, नागपूर हा ग्राहकांना प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. त्यास नमुद ठिकाणाचे मालकाबाबत विचारपूस केली असता, निखील खुशाल खूमेरीया, वय ३१ वर्ष, रा. ईतवारी, जैन मंदीर जवळ, लकडगंज, नागपूर हा असल्याचे सांगीतले. हुक्का पार्लर मालक व मॅनेजर हे संगणमताने स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवितांना

निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ३,४४०/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींचे विरूध्द पोलीस ठाणे सदर येथे कलम ४(अ), ५, २१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. अमोल देशमुख, पोउपनि. निलेश घोगरे, पोहवा. आशिष बहाळ, संदीप शेळके, पोअं. पंकज तिवारी, बालीजी गुट्टे व आशिष जाधव यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे अजनी :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २५.०९.२०२५ चे १७.०० वा. चे सुमारास, फिर्यादीची पत्नी सौ. वासंती प्रशांक गडीकर, वय ५० वर्ष, रा. फ्लॅट नं. १०१, एकदंत्त अपार्टमेंट, चितामणी नगर रोड, चक्रपाणी महाविद्यालय जवळ, अजनी, नागपूर ह्या त्यांचे ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच. ४९ बी. ई. ३०५८ ने पोलीस ठाणे अजनी हद्दीत, ओमकार नगर चौक भारत पेट्रोल पंप समोरून जात असता, एका पांढऱ्या रंगाची कार क्र. एम.एच. ३१ जि.ए. ३९४१ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पत्नीचे मोपेड गाडीला धडक देवुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे पत्नीचे डोक्याला मार लागुन, त्या गंभीर जखमी झाल्या. जखमी यांना उपचाराकरीता न्यूरॉन हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी नामे प्रशांक नारायण गडीकर, वय ५२ वर्ष, रा. फ्लॅट नं. १०१, एकदंत्त अपार्टमेंट, चितामणी नगर रोड, चक्रपाणी महाविद्यालय जवळ, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. आंबेपवार ८६६८६४६३३४ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपीने न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी हा तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. आरोपीने नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०८ नागपुर. | ३००९५४/ २०११ | कलम ४५७, ३८० भा.दं.वी | अमीत उर्फ काल्या घनश्याम वाघमारे, रा. नविन शुक्रवारी, फव्वारा चौक, संजय हिवराळे यांचे घरा जवळ, कोतवाली, नागपुर. | ०३.१०.२०२५ |

**स्वा/–**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप–निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**